अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## बच्छाव यांना उमेदवारी जाहीर होताच काँग्रेस नेत्याचे राजीनामास्त्र

**धुळे/प्रतिनिधी**

महाविकास आघाडीमध्ये धुळे लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेसच्या वाट्याला आला आहे. या मतदारसंघातून काँग्रेसनं डॉ. शोभा बच्छाव यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र बच्छाव यांना उमेदवारी जाहीर होताच काँग्रेसमध्ये नाराजी नाट्य सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे.

काँग्रेसचे धुळे जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर यांनी बच्छाव यांच्या उमेदवारीवर नाराजी व्यक्त करत पदाचा राजीनामा दिला आहे. शामकांत सनेर हे देखील धुळे लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छूक होते. धुळे लोकसभा मतदार संघात बाहेरील व्यक्तीला उमेदवारी देण्यात आली आहे. पक्षाने मला उमेदवारी नाकारून माझ्यावर अन्याय केला, असा आरोप शामकांत सनेर यांनी केला आहे. दरम्यान दोन दिवसांत पक्षाने उमेदवार न बदलल्यास तीव्र भूमिका घेण्याचा इशारा देखील सनेर यांनी दिला आहे. काँग्रेस पक्षाबाबत येत्या दोन दिवसांत भूमिका स्पष्ट करणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.दरम्यान सनेर यांनी बच्छाव यांना उमेदवारी जाहीर होताच जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे.

दोन दिवसांत पक्षाने उमेदवार न बदलल्यास तीव्र भूमिका घेऊ असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यामुळे आता धुळ्यात काँग्रेसच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. शोभा बच्छाव यांच्या उमेदवारीवर सनेर यांच्यासोबतच स्थानिक कार्यकर्त्यांनी देखील नाराजी व्यक्त केली आहे.



### महत्त्वाचे



### व्यावसायिक सिलिंडर स्वस्त

**नवी दिल्ली :** नवीन आर्थिक वर्ष गुरुवारपासून सुरू झाले असून, पहिल्याच दिवशी गॅसच्या दरात मोठा दिलासा मिळाला आहे. लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू असतानाच १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत कपात करण्यात आली आहे, तर घरगुती गॅस सिलिंडरच्या किमती कायम आहेत. देशात २०२४ च्या लोकसभा निवडणुका होत आहेत आणि त्याआधी एलपीजीच्या किंमतीत मोठा दिलासा मिळाला आहे. नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजे १ एप्रिल रोजी तेल विपणन कंपन्यांनी एलपीजी सिलिंडरच्या दरात कपात केली आहे. व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरवर ही कपात करण्यात आली आहे. १९ किलोचा एलपीजी सिलिंडर ३२ रुपयांनी स्वस्त झाला आहे.



### मालेगावात पॅलेस्टाईनचा झेंडा फडकला

**मालेगाव :** रमजान ईदनिमित्त येथील पोलीस कवायत मैदानावर गुरुवारी पार पडलेल्या सामूहिक नमाज पठणाच्या वेळी गर्दीतल्या एका मुलाने पॅलेस्टाईनचा झेंडा फडकविला. रमजान ईदनिमित्ताने मुस्लिम बांधवांनी शहरातील एकूण १४ ठिकाणी नमाज पठण केले.नमाज पठणाचा मुख्य कार्यक्रम पोलीस कवायत मैदानावर एमआयएमचे आमदार मौलाना मुफ्ती इस्माईल यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. या ठिकाणी दीड लाखहून अधिक मुस्लिम बांधवांची उपस्थिती होती. या ठिकाणी नमाज पठणासाठी जमलेल्या गर्दीतील एका मुलाने हातात पॅलेस्टाईनचा झेंडा फडकविल्याचे निदर्शनास आले. इस्रायल देशाकडून पॅलेस्टिनींवर होणाऱ्या कथित अन्यायाचा निषेध म्हणून हा झेंडा फडकविण्यात आला असण्याची शक्यता आहे.

# दुहेरी हत्याकांडातील आरोपींना अवघ्या २४ तासांत अटक

## मंद्रुप पोलिसांची वाऱ्याच्या वेगाने कारवाई

**दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**



नांदणी येथील दहेरी हत्याकांडातील पाचही आरोपींना २४ तासाच्या आत बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांनी अत्यंत ताडीने आणि वेगाने हालचाली करून या पाचही आरोपींना अटक केली. आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना पाच दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

प्रेमसंबंधातून महिला आणि तिच्या प्रियकराचे डोके कुऱ्हाडीने छाटून गुरूवारी हत्या करण्यात आली. हा सारा थरार नांदणी बरूर रस्त्यावरील सलगरे वस्तीजवळच्या शेतात भर दुपारी तीन वाजता घडला. या खळबळ जनक घटनेची दखल पोलिसांनी गांभीर्याने घेतली. या घटनेतील मुख्य आरोपी चेनबसप्पा रेवप्पा सलगरे याला सोलापुरातून अटक करण्यात आली. त्याच्याकडून मिळालेली आणि अन्य खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अन्य चारही आरोपींना अटक करण्यात आली. कल्लाप्पा सिध्दाप्पा सलगरे, लक्ष्मण चंदू सलगरे, उमेश सुरेश सलगरे आणि नागप्पा माने या सहआरोपींनाही अटक करण्यात आली. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले त्यावेळी त्यांना पाच दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले.

**मुले काकांकडे...**

या घटनेनंतर आईला पोरकी झालेली मुले भेदरून गेली आहेत. त्यांना त्यांचे काका आधार देण्याचा प्रयत्न करत आहेत. वडील दिसत नाहीत आईही सोडून गेली त्यामुळे ही मुले कोणाशी बोलत नाहीत, असे शेजाऱ्यांनी सांगितले. दरम्यान मुलांची ख्याली खुशालीबाबत उद्या प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## मित्रांना चिकन न वाढल्याने पत्नीस भोकसले

**मोहोळ :** माझ्या मित्रांना आणखी चिकन का वाढत नाही म्हणून पतीने पत्नीला मारहाण करून पोटात चाकू खूपसून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना देगाव वाळूज (ता. मोहोळ) येथे घडली. याबाबत पत्नीने पतीविरुद्ध तक्रार दिली असून पतीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**पतीविरुद्ध गुन्हा दाखल**

देगाव वाळूज येथे यशोदा चक्रधर काळे या आपल्या कुटुंबासमवेत राहतात. बुधवारी (दि.१०) रोजी दुपारी दीड वाजणेच्या सुमारास त्यांचे पती चक्रधर जुगरास काळे यांनी त्यांची पत्नीस चिकन आणून दिले होते व जेवणासाठी त्यांनी त्यांच्या मित्रांना बोलावले होते त्यानुसार त्यांची पत्नी यशोदा यांनी स्वयपाक बनवून ठेवला व पती व त्यांचे मित्र जेवणास आले नंतर त्यांना जेवण वाढले तु आणखीन मित्रांना चिकन का वाढले नाही म्हणून पती चक्रधर जुगरास काळे यांनी पत्नीस माझ्या मित्रांना आणखी चिकन का वाढत नाही म्हणुन काठीने ,लोखंडी नळीने मांडीवर ,पोटावर मारहाण शिवीगाळ करुन चाकु पोटात खुपसुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणून पती चक्रधर जुगरास काळे यांचे विरूध्द फिर्याद दाखल केली आहे आहे . सध्या यशोदा चक्रधर काळे वय-६५ धंदा-घरकाम रा.देगाव (वा) ता. मोहोळ जि.सोलापुर या सिव्हील हॉस्पीटल सोलापूर येथे उपचार घेत आहेत या घटनेचा तपास पोसई कर्नेवाड हे करित आहेत

# जिल्ह्याच्या विकासासाठी मोदींना साथ द्या

## आ. सचिन कल्याणशेट्टी : अक्कलकोट तालुक्यात ठिकठिकाणी सातपुतेंचा संवाद दौरा

**सोलापूर/प्रतिनिधी**



देशाचा सर्वांगीण विकास करण्याचा ध्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतला आहे. सोलापूर जिल्ह्याचा सर्वांगीण विकासुद्धा साधण्यात त्यांचीच भूमिका महत्वाची राहणार असून या जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन त्यांच्याकडे पर्यायाने सत्ताधारी भाजपकडे आहे, त्यामुळे महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या पाठिशी मताधिक्याचं बळ लावावं, सातपुतेंपा मत म्हणजे भारताचे विकासपुरुष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाच मत आहे, असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

पानमंगरूळ येथे राम सातपुते यांच्या प्रचारार्थ, सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील, डॉ. अशोक हिप्परगी, भाजपचे तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, तालुका उपाध्यक्ष परमेश्वर यादवाड, शिवसिध्द बुळ्ळा, पान मंगरुळच्या सरपंच रत्नाबाई महाजन आदी उपस्थित होते. नागरिकांनी भाजपचे उमेदवार सातपुते यांचे पुष्पवर्षाव आणि फटाक्यांच्या आतिषबाजीत ढोल ताशांच्या गजरात स्वागत केले. आमदार सातपुते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब जनतेच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याचे काम केले. मोदींनी गरिबांना गॅस, घर, शौचालय, शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये, आयुष्यमान भारत योजनेतून ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार दिले. मी ऊसतोड कामगाराचा मुलगा आहे. संघर्षातून यश मिळवले आहे. त्यामुळे सोलापूरकर माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील हा विश्वास आहे, असेही ते यावेळी म्हणाले. परमेश्वर यादवाड यांनी प्रास्ताविक केले.

दरम्यान, गुरूवारी महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गुरुवारी अक्कलकोट विधानसभेतील सुलेरजवळगे, चिंचोळी, केगाव, कुमठा, कोर्से गाव, मुंढेवाडी, कल्लकर्जाळ, धारसंग, शेगाव, आळगे तडवळ, पानमंगरूळ, करजगी या गावांना भेटी देऊन तेथील नागरिकांची संवाद साधला. यावेळी सर्व गावांमध्ये नागरिकांनी जोरदार स्वागत केले.

याप्रसंगी अक्कलकोट विधानसभा प्रमुख राजकुमार झिंगाडे, मल्लिकार्जून बिराजदार, महादेव मुडवे, विशाल दारफळे, श्रीशैल आहेरवाडी, गुरुपुत्र गदगे, दरेप्पा अरवत, पंचप्पा चरटे, काशिनाथ कोडते, लक्ष्मण पाटील, संतोष पाटील, बाबूराव पाटील, मल्लिकार्जुन पाटील, शिवयोगी स्वामी, अशोक मानशेट्टी, बाबुशा कोरपे, गुरू मुडगी, महेश हिंडोळे आदी उपस्थित होते.

## 'लोकांनी आमची दुश्मनी पाहिली, आता दोस्ती पाहुद्या'

**पुणे :** सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराच्या निमित्ताने सासवडमध्ये महायुतीचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात शिवसेना नेते विजय शिवतारे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकाच मंचावर एकत्र आले. विशेष म्हणजे या दोन्ही नेत्यांचं मंचावर मनोमिलन होताना देखील बघायला मिळालं. लोकांनी आमची दुश्मनी पाहिली, आता दोस्ती पाहुद्या', असं विजय शिवतारे म्हणाले. विशेष म्हणजे त्यांनी अजित पवार यांचा उल्लेख माझे लाडके मित्र आणि स्नेही असा केला. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कोयनेच्या खोऱ्यातून ठाण्यात जाऊन आनंद दिघे यांच्या संपर्कात येऊन लोकांचे चांगलं काम करणारे मुख्यमंत्री, असा केला.

मतदारसंघात लोकांचा मोठा रोष होता. राष्ट्रनिष्ठा ही बाब भाजपकडे असल्याने आम्ही सर्वजण एकत्र आहोत. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी एकत्र आलो. गुंजवणीच्या पाण्याने पुरंदरचा चेहरा मोहरा बदलणार आहे.

# खासगी सचिव बिभव कुमार बडतर्फ

**नवी दिल्ली**



**केजरीवाल यांच्या अडचणीत वाढ**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. केजरीवाल यांचे खासगी सचिव बिभव कुमार यांना बडतर्फ करण्याचा आदेश जारी करण्यात आलाय. दिल्लीच्या दक्षता विभागाने हा आदेश जारी केला आहे. कथित दारू घोटाळा प्रकरणी ईडीकडून बिभव कुमार यांची देखील अनेकवेळा चौकशी करण्यात आली आहे.

एका कर्मचाऱ्याला धमकावल्याप्रकरणी बिभव कुमार यांच्याविरुद्ध २००% मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आता बिभव कुमार यांची खासगी सचिवपदी झालेली नियुक्ती बेकायदेशीर ठरवण्यात आली आहे. या सोमवारी ईडीकडून बिभव कुमार यांची पुन्हा चौकशी करण्यात आली होती.

केजरीवाल सध्या तिहार जेलमध्ये आहेत. मात्र गेल्या २ दिवसांपासून त्यांना मोठे धक्के बसलेत. कथित दारू घोटाळा प्रकरणी केजरीवाल यांच्या अडचणी वाढत असताना ही मोठी कारवाई मानली जात आहे. मंगळवारी झालेल्या सुनावणीत केजरीवाल यांना झालेली अटक योग्य असल्याचं दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटलं, तसेच याबाबतची याचिका फेटाळली.त्यानंतर बुधवारी वकिलांना आठवड्यातून पाच वेळा भेटता यावे अशी याचिका केली होती, ही याचिका देखील दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. त्यावर त्यांनी सुप्रिम कोर्टात धाव घेतली. येथे तात्काळ सुनावणी व्हावी अशी मागणी केली होती. मात्र येथेही विशेष खंडपीठ स्थापन करण्यात आले नाही. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर सुरू असलेल्या कारवाईमुळे त्यांच्याच सरकारमधील मंत्री राजकुमार आनंद यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आता दिल्लीच्या दक्षता विभागाने बिभव कुमार यांना खासगी सचिव पदावरून बडतर्फ करण्याचे आदेश दिले आहे.

## अभिनेत्याचा साखरपुड्याच्या दिवशीच अपघाती मृत्यू

**छत्तीसगड :** सूरज मेहर या अभिनेत्याचा रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघातामुळे चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सूरज हा चित्रपटाचे शूटिंग संपवून घरी परतत असताना हा अपघात झाला आहे. रायपूरमध्ये कार आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातात त्याला आपला जीव गमवावा लागला. धक्कादायक म्हणजे सूरजच्या साखरपूडच्याच दिवशी ही घटना घडली आहे.



## सेवा संघाचे आमदार सातपुतेंना समर्थन

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापुरातून पुण्यात गेलेल्या तरुणांना नोकरी व राहण्यासाठी मदत करणाऱ्या सोलापूर जिल्हा सेवा संघाने गुरूवारी आमदार राम सातपुते यांना खासदारकीच्या निवडणुकीसाठी आपलं समर्थन दिलं. याबाबतचे पत्र अक्कलकोट दौऱ्यावर असलेल्या सातपुते यांना आळगे येथे देण्यात आलं.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील, श्री स्वामी समर्थ साखर कारखान्याचे अध्यक्ष संजीवकुमार पाटील, भाजप अक्कलकोट तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, परमेश्वर यादवाड, महादेव मुडवे, बाबूराव कोडते यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोलापूर जिल्हा सेवा संघाच्या कार्यकारिणीची बैठक नुकतीच झाली. त्या बैठकीत महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना बिनशर्त पाठिंबा देण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायाच्यानिमित्ताने अनेक तरूण सोलापुरातून पुण्यात येतात. त्यांना मदत करण्याचे काम सोलापूर जिल्हा सेवा संघाकडून करण्यात येते. अशा सर्व तरुणांना प्रत्यक्ष भेटून, फोनवरून त्यांना महायुतीचे उमेदवार आमदार सातपुते यांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे, असे सोलापूर जिल्हा सेवा संघाचे अध्यक्ष महेश बारसावडे यांनी सांगितले. सोलापूर जिल्हा सेवा संघाने पाठिंबा दिल्यामुळे सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात भाजपची ताकद वाढणार आहे. यावेळी उपाध्यक्ष राजेंद्र अगावणे, सचिव शिवानंद जाधव, कार्यकारी सभासद श्रीकांत चव्हाण, माणिक सुभेदार, पंढरीनाथ आयाचित, बालाजी शिंदे आदी उपस्थित होते.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता हे अडथळे 'या काळात' आम्हाला त्रास देणार !

| कल्याण |
| --- |
| 170-83-229 |

| मुंबई |
| --- |
| 578-01-489 |

### महायुती सरकारमधील मंत्र्याचा गौप्यस्फोट

# वडेट्टीवारांचा लवकरच काँग्रेसला रामराम

**मुंबई/प्रतिनिधी**

काँग्रेसला ऐन निवडणुकित मोठे खिंडार पडणार असल्याचा दावा शिंदे - फडणवीस - पवार सरकारमधील मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी केला आहे. काँग्रेस मधील मोठे नेते आणि विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार लवकरच भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याचा गौप्यस्फोट अन्न व औषध प्रशासन मंत्री आत्राम यांनी केला आहे.

महायुती सरकारमध्ये अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी ऐन लोकसभा निवडमुकित काँग्रेसला खिंडार पडणार असल्याचा दावा केला आहे. ते म्हणाले की, मी आदिवासी माणूस आहे कधीही खोटं बोलणार नाही. अशोक चव्हाण यांनी काँग्रेस



सोडल्यानंतर त्यांचा उजवा हात असलेले विजय वडेट्टीवार देखील लवकरच पक्षाला रामराम ठोकणार आहेत. अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांना राज्यसभेची जागाही मिळाली. त्यानंतर नामदेव उसंडी, प्रकाश देवतळे भाजपमध्ये आले. आता लवकरच विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार हे देखील भाजपमध्ये येतील. त्यांची भाजप नेत्यांसोबत चर्चा झाली आहे. या चर्चांचा मी साक्षीदार असल्याचा दावाही आत्राम यांनी केला आहे.

वडेट्टीवार यांनी काही दिवसांपूर्वीच धर्मरावबाबा आत्राम यांच्यावर जोरदार टीका केली होती. ते म्हणाले होते की, धर्मरावबाबा आत्राम यांच्याकडे पैसे आहेत पण बुद्धी नाही. त्यांच्या या टीकेनंतर आत्राम यांनी हा गौप्यस्फोट केला आहे. धर्मरावबाबा आत्राम हे अजित पवार गटाचे आमदार आहेत.

**धर्मरावबाबा आत्राम यांची नार्कोटेस्ट करा..**

विजय वडेट्टीवार हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे धर्मरावबाबा आत्राम यांनी बोलताना सांगितले आहे. तर विजय वडेट्टीवार यांनी आत्राम यांचे सर्व दावे फेटाळून लावले आहेत. वडेट्टीवार म्हणाले की, मी कुठेही जाणार नाही. मी काँग्रेसमध्ये आहे आणि येथेच राहणार आहे. धर्मरावबाबा आत्राम हे खोटं बोलत आहेत, त्यांची नार्को टेस्ट केली पाहिजे, त्यातून सत्य बाहेर येईल. दूध का दूध पाणी का पाणी होईल, असे वडेट्टीवार म्हणाले.